RNI No. MAHBIL/2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2010-12

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष २, अंक ७७] शनिवार, मार्च ५, २०११/फाल्गुन १४, शके १९३२ [पृष्ठे ३

किंमत : रुपये १२.००

### असाधारण क्रमांक ११

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### महसूल व वन विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ मार्च २०११

### अधिसूचना

नोंदणी अधिनियम, १९०८.

क्रमांक आस्थापना. २०१०/३४६८/प्र. क्र. १४९/म-१.—ज्याअर्थी, नोंदणी अधिनियम, १९०८ (१९०८ चा १६) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, याच्या कलम ७ च्या पोट-कलम (१) द्वारे, प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, काढण्यात आलेली शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक आस्थापना २००७/२४/प्र.क्र. २९/म-१, दिनांक २९ जून २००७ याद्वारे, महाराष्ट्र शासनाने नोंदणी जिल्हा रायगड यांच्या नोंदणी उप-जिल्हा पेणमध्ये सह दुय्यम निबंधक, पेण क्रमांक २ यांच्या कार्यालयाशी स्थापना केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त कार्यालयात नोंदणी करण्यात आलेल्या दस्तऐवजांची संख्या फारच कमी आहे आणि नव्याने निष्पादित करावयाच्या दस्तऐवजांची भविष्यात, दुय्यम निबंधक, पेण १ यांच्या कार्यालयात नोंदणी होऊ शकते असे महाराष्ट्र शासनाच्या निदर्शनास आले आहे आणि म्हणून उक्त कार्यालय बंद करण्याचा निर्णय घेतला आहे ;

त्याअर्थी आता, नोंदणी अधिनियम, १९०८ (१९०८ चा १६) महाराष्ट्र राज्यास लागू असतांना, याच्या कलम ७ च्या पोट-कलम (१) आणि मुंबई सर्वसाधारण वाक्खंड अधिनियम, १९०४ (१९०४ चा मुंबई १) याच्या कलम २१ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे सह दुय्यम निबंधक, पेण क्रमां २, यांचे उक्त कार्यालय बंद करीत आहे आणि या प्रयोजनार्थ, शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक आस्थापना-२००७/२४/प्र.क्र. २१/म-१, दिनांक २९ जून २००७ ही दिनांक १ मार्च २०११ पासून विखंडित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मिलिंद गवादे,**
शासनाचे उप सचिव.

# REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 1st March 2011

*NOTIFICATION*

REGISTRATION ACT, 1908.

No. EST. 2010/3468/CR-149/M-1.—Whereas, the Government of Maharashtra has *vide* Government Notification, Revenue and Forests Department, No. Establishment 2007/24/CR-29/M-1, dated the 29th June 2007, issued in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 7 of the Registration Act, 1908 (XVI of 1908), in its application to the Stnte of Maharashtra, established the office of Joint Sub-Registar, Pen No. 2 in the Registration Sub-district, Pen of the Registration District Raigad;

And whereas, it is noticed by the Government of Maharashtra that the number of documents registered in the said officeare very less and newly executed documents can be registered in the office of Sub-Registrar, Pen 1 in future and hence decided to close down the said office;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 7 of the Registration Act, 1908 (XVI of 1908), in its application to the State of Maharashtra read with section 21 of the Bombny General Clauses Act, 1904 (Bom. I of 1904), and all other powers enabling it in this behlaf, the Government of Maharashtra herebv closes down the said office of Joint Sub-Registrar, Pen No. 2 and for that purpose, rescinds the Government Notification, Revenue and Forests Department, No. Establishment 2007/24/CR. 29/M-1, dated the 29th June 2007, with effect from the 1st March 2011.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

MILIND GAWADE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.